जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 APR 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरणसाठी पंजाब नॅशनल बँकेच्या वतीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना धनादेश सुपूर्द करताना बँकेचे प्रमुख रंजन सिंग. शेजारी इतर.

# विद्यापीठ क्रिकेट मैदानासाठी पंजाब नॅशनल बँकेकडून एक लाखाचा निधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर शाखेकडून एक लाख रुपयांचा सामाजिक दायित्व निधी देण्यात आला.

पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे धनादेश सुपूर्द केला. विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य ॲड. अजित पाटील यांनी या संदर्भातील ठराव मांडला होता. त्यांनी हा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केला.

या प्रसंगी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, पंजाब नॅशनल बँकेचे अधिकारी जतीन परमार, ॲड. अंकिता मिठारी, राहुल पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 APR 2025

तरुण भारत



कोल्हापूर : राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेतील विजेत्या संघाबरोबर शिवाजी विद्यापीठातील पदाधिकारी, प्रशिक्षक.

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा द्वितीय क्रमांक

**कोल्हापूर :** अखिल भारतीय विद्यापीठ महासंघ नवी दिल्ली मार्फत आयोजित महर्षी मार्कंडेश्वर विद्यापीठ मुल्लाना, जिल्हा अंबाला, हरियाणा येथे झालेल्या सातव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचा १६ जणांचा संघ सहभागी झाला होता. या संघाने राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सलोखा या दोन विषयावर दोन कव्वाली सादर केल्या.

या संघास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, व विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. तानाजी चौगुले यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच मुख्य मार्गदर्शक दीपक बिडकर व त्यांच्या सहकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून विजयसिंह यादव महाविद्यालय पेठ वडगावचे डॉ. राजाराम अतिग्रे यांनी काम पाहिले. या संघास विद्यार्थी विकास विभागाच्या सहाय्यक अधीक्षक सुरेखा आडके व इतर सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

03 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंजाब बँकेचा विद्यापीठाला मदतीचा हात

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर शाखेने एक लाख रुपयांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) दिला आहे.

पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी सामाजिक दायित्व निधीअंतर्गत विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरणासाठी एक लाख रुपयांचा धनादेश आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य ॲड. अजित पाटील यांनी या संदर्भातील ठराव मांडला होता. या धनादेश प्रदानप्रसंगी ॲड. अभिषेक मिठारी, जतीन परमार, ॲड. अंकिता मिठारी, राहुल पाटील उपस्थित होते.



कोल्हापूर : पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाच्या दुरुस्तीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी अजित पाटील, अभिषेक मिठारी, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 APR 2025
लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाच्या दुरुस्तीसाठी पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर शाखेकडून एक लाख रुपयांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्याकडे बुधवारी सुपुर्द केला.

# क्रिकेट मैदानासाठी पंजाब नॅशनल बँकेकडून एक लाखाचा निधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर शाखेकडून एक लाख रुपयांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) देण्यात आला. पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी सामाजिक दायित्व निधीअंतर्गत विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी एक लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्याकडे बुधवारी सुपुर्द केला. विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य ॲड. अजित पाटील यांनी यासंदर्भातील ठराव मांडला होता. त्यांनी हा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले.

या धनादेश प्रदानप्रसंगी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, पंजाब नॅशनल बँकेचे अधिकारी जतीन परमार, ॲड. अंकिता मिठारी, राहुल पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 APR 2025

तरुण भारत



कोल्हापूर :पंजाब नॅशनल बँकेकडून शिवाजी विद्यापीठाच्या मैदान दुरुस्तीसाठी एक लाखाचा चेक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपुर्द करताना कोल्हापूर सर्कलप्रमुख रंजन सिंग. सोबत बँकेचे अधिकारी जतीन परमार, ॲड. अभिषेक मिठारी, अंकिता मिठारी, राहुल पाटील.

# विद्यापीठ क्रिकेट मैदानासाठी पंजाब नॅशनल बँकेकडून लाखाचा निधी

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर शाखेकडून एक लाख रुपयांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) देण्यात आला आहे. पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी सामाजिक दायित्व निधीअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी एक लाख रुपयांचा धनादेश बुधवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

येथून पुढेही आवश्यकता भासल्यास आणखी निधी उपलब्ध करून देण्याचेही सूतोवाच त्यांनी केले. विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य ॲड. अजित पाटील यांनी या संदर्भातील ठराव मांडला होता. त्यांनी हा निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केले. या धनादेश प्रदान प्रसंगी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, बँकेचे अधिकारी जतीन परमार, ॲड. अंकिता मिठारी, राहुल पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 APR 2025

पुण्यनगरी

# संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागात पालक मेळावा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा आजी-माजी विद्यार्थी व पालक मेळावा बुधवारी उत्साहात झाला. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या सभागृहामध्ये या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध सतारवादक अरुण डोंगरे, डॉ. आझाद नायकवडी, डॉ. आनंद धर्माधिकारी यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या मेळाव्याच्या निमित्ताने संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी भावगीत, गझल, समूहगीत, मूकनाट्य, लघुनाटिका, नकला, पारंपरिक लोकनृत्य, ठसकेबाज लावणी आदी विविधांगी कलागुणांचे अतिशय बहारदार सादरीकरण केले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. सूत्रसंचालन आसावरी लोहार हिने केले. संदेश गावंदे, विक्रम परीट यांनी तबला साथ, तर प्रथमेश पाटील यांनी संवादिनी साथ केली. कार्यक्रमाचे संयोजन बबन माने, मल्हार जोशी, ओंकार सूर्यवंशी, अतुल परीट, विकास कांबळे, युवराज केळुस्कर, राज पाटील यांनी केले.

03 APR 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानासाठी निधी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण यासाठी पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर शाखेकडून एक लाख रुपयांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) देण्यात आला आहे. पंजाब नॅशनल बँकेच्या कोल्हापूर सर्कलचे प्रमुख रंजन सिंग यांनी सामाजिक दायित्व निधीअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरण करण्यासाठी एक लाख रुपये निधीचा धनादेश बुधवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

रंजन सिंग यांनी, येथून पुढेही क्रिकेट मैदानाची दुरुस्ती व नूतनीकरणासाठी आवश्यकता भासल्यास आणखी निधी उपलब्ध करून देण्याचे सूतोवाच केले. विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य ॲड. अजित पाटील यांनी या संदर्भातील ठराव मांडला होता. त्यांनी हा निधी मिळवण्यासाठी प्रयत्न केले.

धनादेश प्रदानप्रसंगी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, पंजाब नॅशनल बँकेचे अधिकारी जतीन परमार, ॲड. अंकिता मिठारी, राहुल पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 APR 2026
तरूण भारत

# आजी-माजी विद्यार्थी, पालक मेळावा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या आजी-माजी विद्यार्थी व पालक मेळावा बुधवारी मोठ्या उत्साहात झाला. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या सभागृहामध्ये या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सतारवादक अरुण डोंगरे, शाहीर व विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. आझाद नायकवडी, डॉ. आनंद धर्माधिकारी आदी प्रमुख अतिथी तसेच मोठ्या संख्येने आजी-माजी विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या मेळाव्याच्या निमित्ताने संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी भावगीत, गझल, समूहगीत आदी कलागुणांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. सूत्रसंचालन आसावरी लोहार हिने केले. संदेश गावंदे, विक्रम परीट यांनी तबलासाथ प्रथमेश पाटील यांनी संवादिनीसाथ केली. बबन माने, मल्हार जोशी, ओंकार सूर्यवंशी, अतुल परीट, विकास कांबळे, युवराज केळुस्कर, राज पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 APR 2025

पुण्यनगरी

# शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे 'चे शनिवारी शिवाजी विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी लिहिलेल्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन 'द हिंदू' वृत्तपत्र समूहाचे सिनिअर डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांच्या हस्ते शनिवार, दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता मास कम्युनिकेशन विभागात होणार आहे. यावेळी डॉ. राधेश्याम जाधव हे 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमीमांसा' या विषयावर विशेष व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के आहेत. शाहूपूर्व आणि राजर्षी शाहू यांच्या काळात कोल्हापुरात कोणती वर्तमानपत्रे प्रसिद्ध होत होती आणि या वर्तमानपत्रांनी त्या काळात कोणते विषय हाताळले होते, या दुर्लक्षित विषयावर डॉ. जाधव यांनी संदर्भासह पुस्तकात तपशीलवार मांडणी केली. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

03 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगीत-नाट्यशास्त्र विभागामध्ये कलाविष्कारांचे सादरीकरण

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा आजी-माजी विद्यार्थी, पालक मेळावा आज उत्साहात झाला. या विभागाच्या सभागृहातील मेळाव्यात विद्यार्थ्यांनी कलाविष्कारांचे बहारदार सादरीकरण केले.

या विभागाच्या विद्यार्थ्यांनी भावगीत, गझल, समूहगीत, मूकनाट्य, लघुनाटिका, नकला, पारंपरिक लोकनृत्य, ठसकेबाज लावणी आदी विविधांगी कलागुणांचे बहारदार सादरीकरण केले. यावेळी सतारवादक अरुण डोंगरे, शाहीर डॉ. आझाद नायकवडी, डॉ. आनंद धर्माधिकारी आदींसह माजी विद्यार्थी, पालक उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी प्रास्ताविक केले. आसावरी लोहार हिने सूत्रसंचालन केले. संदेश गावंदे, विक्रम परीट यांनी तबलासाथ, तर प्रथमेश पाटील यांनी संवादिनीसाथ केली.



कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठाच्या संगीत-नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी पालक मेळाव्यात कलाविष्कारांचे बहारदार सादरीकरण केले.

03 APR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शहराच्या २६ टक्के क्षेत्राला महापुराचा धोका

## शिवाजी विद्यापीठाच्या 'फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेल'ने केलेल्या संशोधनातून धक्कादायक निष्कर्ष समोर

कोल्हापूर : आशिष शिंदे

हवामान बदल आणि रखडलेली हद्दवाढ यामुळे होणाऱ्या दिशाहीन विकासाचा परिणाम म्हणून २०५० पर्यंत कोल्हापुरात महापुराचा राक्षस अक्राळविक्राळ रूप धारण करण्याची भीती आहे. शहरातील २६.०८ टक्के क्षेत्र महापुराच्या अति उच्च संवेदनशील श्रेणीत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

- शहरातील २४.८९ चौ. कि. मी. क्षेत्र अतिउच्च संवेदनशील श्रेणीत
- पूरप्रवण क्षेत्राचा नकाशा तयार
- नदीकाठची सखल क्षेत्रे आणि जास्त पर्जन्यमान असलेल्या भागांना अधिक धोका
- १० प्रमुख घटकांचे मॅपिंग
- शहराच्या पूर व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरणार



फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेल तंत्र वापरून तयार करण्यात आलला पूरप्रवण क्षेत्राचा नकाशा.

**महापूर संवेदनशील क्षेत्रांचे वर्गीकरण, क्षेत्र व टक्केवारी**

| | |
|---|---|
| कमी संवेदनशीलता | ५१.६१ क्षेत्र (चौ.किमी) - ४६.२३ टक्के |
| मध्यम संवेदनशीलता | ३९.३४ (चौ.किमी) - ३५.१८ टक्के |
| उच्च संवेदनशीलता | २७.८३ (चौ.किमी) - २१.१८ टक्के |
| अतिउच्च संवेदनशीलता | २४.८९ (चौ.किमी) - २६.०८ टक्के |

> फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेलद्वारे तयार झालेला पूर संवेदनशील नकाशा शहराच्या पूर व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या नकाशाच्या मदतीने पूरप्रवण क्षेत्रांची अचूक माहिती मिळण्यास अधिक मदत होईल. त्यामुळे पूर व्यवस्थापनासाठी योग्य उपाययोजना करणे शक्य होईल.
> - डॉ. सुधीर पोवार, भूगोलशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

**महापुराचा धोका सर्वाधिक असलेल्या क्षेत्रांबाबत निष्कर्ष**

१. कोल्हापुरातील कमी उतार (० - १.५) आणि कमी उंची (४४२ ते ४६७ मीटर) असलेल्या क्षेत्रांना महापुराचा सर्वाधिक धोका

२. ३४६.९० ते ३७१.३४ मि.मी. आणि ३२५.२४ ते ३४६.९० मि.मी. पाऊस झाल्यास फ्लड रेशो १ पेक्षा जास्त असतो. अशावेळी महापूर येण्याची शक्यता जास्त असते.

३. नदीपासून ५०० ते २,००० मीटर अंतर असलेल्या भागात फ्लड रेशो सर्वाधिक (३.३९ ते २.५३) आहे. यामुळे या भागांना सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे.

४. स्थलाकृतिक ओलावा निर्देशांक (ट्रॉपिकल वेटनेस इंडेक्स) हा भविष्यातील महापुराच्या अंदाजासाठी महत्त्वाचा घटक आहे. शहराच्या उत्तर-मध्य भागात हा इंडेक्स सर्वाधिक. यामुळे येथे पुराची जोखीम अधिक आहे.

शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागाने फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेल वापरून हे संशोधन करण्यात आले असून शहराचा पूरप्रवण संवेदनशील नकाशा तयार करण्यात आला आहे. हा नकाशा भविष्यात पूर व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरू शकतो.

फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेल तंत्रज्ञानाचा वापर भूतकाळात घडलेल्या भूकंप, भूस्खलन, दरडी कोसळणे, महापूर या सारख्या विनाषकारी घटनांच्या माहितीच्या आधारे भविष्यातील संभाव्य धोके ओळखण्यासाठी केला जातो. याच तंत्राचा कोल्हापुरातील महापुराच्या स्थितीची माहिती जाणून घेण्यासाठी पहिल्यांदाच वापर करण्यात आला आहे.

संशोधनासाठी निवडलेल्या सर्व घटकांचे विश्लेषण फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेलच्या आधारे केल्यानंतर कोल्हापूर शहरातील २६.०८ टक्के क्षेत्र महापुराच्या धोक्यासाठी अतिउच्च संवेदनशील, २७.८३ टक्के क्षेत्र उच्च संवेदनशील, ३९.३४ क्षेत्र मध्यम संवेदनशील असल्याचे समोर आले आहे. प्रामुख्याने नदीकाठची सखल क्षेत्रे आणि जास्त पर्जन्यमान असलेल्या क्षेत्रांना भविष्यात पुराचा धोका अधिक आहे.

### धोका ओळखण्यासाठी या दहा घटकांचा घेतला आधार

महापुराचा धोका ओळखण्यासाठी दहा महत्त्वाच्या घटकांचा आधार घेण्यात आला. यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) वापरून १० प्रमुख घटकांचे मॅपिंग करण्यात आले. यात जमिनीच्या उताराचे प्रकार, उंची, पाऊस, नदीपासूनचे अंतर, प्रवाह शक्ती निर्देशांक (एसपीआय), स्थलाकृतिक ओलावा निर्देशांक (ट्रॉपिकल वेटनेस इंडेक्स), स्थलाकृतिक खडबडीतपणा निर्देशांक (ट्रॉपिकल रफनेस इंडेक्स), समतल वक्रता, प्रोफाईल वक्रता, जमिनीचा वापर आणि भूआवरणाचा समावेश आहे.

### सॅटेलाईट इमेज, जीआयएसचा वापर

उपग्रह प्रतिमा, भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आणि क्षेत्रीय सर्वेक्षणाचा आधार घेऊन फ्रिक्वेन्सी रेशो मॉडेल तंत्राचा वापर करून संशोधन करण्यात आले. २००५, २०१९ आणि २०२१ मध्ये आलेल्या महापुराच्या घटनांची माहिती गोळा करून सविस्तर पूरप्रवण क्षेत्रांची यादी तयार करण्यात आली आहे.